[वेळ: ३ तास] [ गुण:६० ]

Please check whether you have got the right question paper.

सूचना:
१. प्रत्येक बहुपर्यायी प्रश्नास एक (१ गुण) आहे.
२. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
३. प्रत्येक वर्णनात्मक प्रश्नास प्रत्येकी ३ गुण आहेत.

१) महाराष्ट्रात मराठी माध्यमाच्या शाळेत मराठी भाषेचा अभ्यास ______ म्हणून करतात.
अ) प्रांतभाषा
ब) मातृभाषा
क) संपर्कभाषा
ड) जागतिक भाषा

२) भाषेची मुलभूत संरचना आणि अभ्यासक्रमातील व्याकरणाचे घटक समजावून देणे हे उद्देश साध्य करण्यासाठी शिक्षकांना _______ सहाय्य करते.
अ) पाठ्यपुस्तक
ब) अध्यापन पद्धती
क) दृकश्राव्य साधने
ड) स्वाध्याय पुस्तिका

३) नाट्यीकरण पद्धतीमध्ये _____ ला महत्व नाही.
अ) संहिता लेखन
ब) पात्रांची अचूक निवड
क) अत्याधुनिक सुविधा
ड) अभिनय

४) मराठी भाषा शिक्षकाने ____
अ) इतर भाषा शिकणे आवश्यक नाही
ब) इतरही भाषा शिकणे आवश्यक आहे
क) फक्त मराठीवर लक्ष केंद्रित करावे
ड) इतर भाषांचा उपहास करावा.

५) विद्यार्थ्यांच्या _______ विकासात मातृभाषेचे महत्व अनन्यसाधारण आहे.
अ) सर्वांगिण
ब) वैचारिक
क) बौद्धिक
ड) शैक्षणिक



9BC9A6AF6921C5DD75671D1585F2355A

६) अध्ययन – अध्यापन प्रभावी होण्यासाठी भाषा शिक्षकाने _____
अ) वर्गात भरपूर संदर्भ पुस्तके न्यावी
ब) नवनवीन अध्यापन पद्धती व तंत्रांचा वापर करावा.
क) फक्त शैक्षणिक साधने वापरावी
ड) फक्त शैक्षणिक चित्रफीत दाखवावी

७) स्वत:चे विचार शाब्दिक व अशाब्दिक रीतीने मांडता येणे म्हणजे _______.
अ) परिणामकारक संप्रेषण
ब) परिणामकारक नियोजन
क) परिणामकारक संकलन
ड) परिणामकारक विश्लेषण

८) व्याख्यान पद्धतीचा उपयोग करताना शिक्षकाने _______.
अ) भरपूर नोट्स दयाव्या
ब) विषयाला अनुसरून मुद्द्यांची मांडणी करावी
क) फक्त पुस्तके वाचण्यास सांगावे
ड) एका विद्यार्थ्यास फलक लेखन करण्यास सांगावे

९) समानुभूती म्हणजे ______.
अ) स्वत:चे अंतर्मन जाणण्याची क्षमता
ब) स्वत:चे दुर्गुण जाणण्याची क्षमता
क) दुसऱ्यांच्या भूमिकेत शिरण्याची क्षमता
ड) दुसऱ्यांचे दुर्गुण जाणण्याची क्षमता

१०) खालीलपैकी______ हा शैक्षणिक विद्याशाखेचा प्रकार नाही.
अ) उपयोजित-कठीण
ब) शुद्ध – कठीण
क) अवघड – कठीण
ड) उपयोजित – सुलभ

११) अमराठी भाषिक विद्यार्थ्यासाठी मराठीचे अध्यापन करताना _____ अधिक भर देणे आवश्यक असते.
अ) पठण
ब) मनन
क) साहित्यिक अभिरुची
ड) मौखिक अभिव्यक्ती



9BC9A6AF6921C5DD75671D1585F2355A

१२) प्रत्येक विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, मानसिक क्षमता, आकलन शक्ती, ग्रहण क्षमता, अभिरुची वेगवेगळी असते हे ____ आहे.
अ) एकीकरणाचे तत्व
ब) व्यक्तिभिन्नतेचे तत्त्व
क) अभिरुचीचे तत्त्व
ड) सहसंबंधाचे तत्त्व

१३) _______ चा उपयोग प्रामुख्याने उच्च स्तरावरील अध्यापनासाठी केला जातो.
अ) नाटयीकरण पद्धती
ब) कथाकथन पद्धती
क) व्याख्यान पद्धती
ड) क्रीडन पद्धती

१४) मराठी भाषा शिक्षकाचा दृष्टीकोन ______ असावा.
अ) पक्षपाती
ब) अहंमन्य
क) नि:पक्षपाती
ड) स्वैराचारी

१५) अवघड विद्याशाखेत माहिती संकलनासाठी ______ चा उपयोग केला जातो.
अ) तंत्रज्ञान
ब) प्रायोगिक पद्धती
क) वैचारिक पद्धती
ड) प्रश्नावली

१६) अमराठी भाषिकांना मराठी भाषा _____ मदत करते.
अ) न्यूनगंड जोपासण्यासाठी
ब) मोक्षप्राप्तीसाठी
क) आत्मप्रकटीकरणासाठी
ड) अध्यात्मिक आनंद प्राप्तीसाठी

१७) एखाद्या समस्येवर तोडगा काढणे म्हणजे_____.
अ) स्व जागृती
ब) समस्या निराकरण
क) सृजनशील विचार
ड) समानुभूती



9BC9A6AF6921C5DD75671D1585F2355A

१८) विदयाशाखेची व्याप्ती ही त्यात समाविष्ट असलेल्या ____ वर अवलंबून असते.
अ) पद्धती
ब) अभ्यासक्रम
क) विषय
ड) अध्ययन अनुभव

१९) ______ जीवन कौशल्याशी निगडीत नाही.
अ) संप्रेषण कौशल्य
ब) चिकित्सक विचार
क) मतभेद
ड) निर्णयक्षमता

२०) शिक्षणशास्त्राचा समावेश ______ विद्याशाखेत होतो.
अ) उपयोजित – सुलभ
ब) उपयोजित – कठीण
क) शुद्ध – कठीण
ड) शुद्ध – सुलभ

२१) अमराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मराठी भाषेचे महत्व खालीलपैकी कोणते नाही?
अ) दैनंदिन व्यवहार
ब) स्वतःची भाषिक प्रगल्भता वाढविणे
क) समाजाशी संवाद साधणे
ड) स्वत:च्या भाषेचे महत्व वाढविणे

२२) नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, तंत्र, दृकश्राव्य साहित्य याद्वारे विद्यार्थ्यामध्ये अध्ययनाचे _______ निर्माण करता येते.
अ) एकीकरण
ब) अभिरुची
क) तीव्रता
ड) सहसंबंध

२३) जीवनकौशल्य शिक्षणाचा मुख्य उद्देश _____ आहे.
अ) विद्यार्थ्यांना आनंदी ठेवणे
ब) पालकांना मदत करणे
क) विद्यार्थ्यांना बदलत्या परिस्थितीशी तोंड देण्यास सक्षम बनविणे
ड) विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवणे



9BC9A6AF6921C5DD75671D1585F2355A

२४) भाषा शिक्षकाने व्यवसाय वृद्धीसाठी ______
अ) सेवांतर्गत प्रशिक्षण घ्यावे
ब) सेवापूर्व प्रशिक्षण पुरेसे आहे
क) वादविवाद स्पर्धेत भाग घ्यावा
ड) वरिष्ठांची मदत घ्यावी

२५) समाजाने ______ भाषेस दिलेले अवास्तव महत्व हे मराठीच्या अधोगतीचे मूळ कारण ठरले.
अ) हिंदी
ब) उर्दू
क) इंग्रजी
ड) संस्कृत

२६) खालीलपैकी ____ हे भाषेचे वाङ्मयीन उद्दिष्ट आहे.
अ) श्रवण
ब) वाचन
क) रसग्रहण
ड) लेखन

२७) भाषा शिक्षकाने निरंतर _____
अ) स्वाभिमानी असावे
ब) ताठर भूमिका असावी
क) प्रयोगशील असावे
ड) आत्मसन्मान जपावा

२८) ________ हा कथाकथन पद्धतीचा फायदा नाही.
अ) कल्पनाशक्तीला वाव मिळतो
ब) मुल्यविकसित होतात
क) संशोधन वृत्तीचा विकास होतो
ड) अभिरुची निर्माण होते

२९) पद्यामधील भाव व सौंदर्य व्यक्त करण्यासाठी या पद्धतीचा उपयोग केला जातो.
अ) कथाकथन पद्धती
ब) रसग्रहण पद्धती
क) नाट्यीकरण पद्धती
ड) क्रीडन पद्धती



9BC9A6AF6921C5DD75671D1585F2355A

३०) विद्यार्थ्यांच्या सृजनात्मक शक्तीचा विकास म्हणजे ______.
अ) रसग्रहण
ब) अनुकरण
क) ग्रहण
ड) नवनिर्मिती

**वर्णनात्मक प्रश्न**

**प्रश्न. १** मराठी भाषा अध्यापनाची तत्त्वे सांगून त्यातील कोणतीही दोन तत्त्वे सोदाहरण लिहा. ०३

**प्रश्न. २** मराठी भाषा शिक्षकाची गुणवैशिष्टये थोडक्यात लिहा. ०३

**प्रश्न. ३** बेन्चर व बिग्लन यांनी केलेले विद्याशाखेचे वर्गीकरण थोडक्यात लिहा. ०३

**प्रश्न. ४** रसग्रहण पद्धतीच्या पायऱ्या लिहा. ०३

**प्रश्न. ५** मराठी शिक्षकासमोरील सद्यकाळातील कोणतीही तीन आव्हाने सविस्तर लिहा. ०३

**प्रश्न. ६** मराठी व्याकरण अध्यापनाच्या क्रीडन पद्धतीचे महत्व थोडक्यात लिहा. ०३

**प्रश्न. ७** विविध जीवनकौशल्य मराठी अध्यापनाच्या मदतीने कशाप्रकारे शिकविता येतील? ०३

**प्रश्न. ८** मराठी भाषा अध्यापनाची ग्रहणात्मक उद्दिष्टे सोदाहरण लिहा. ०३

**प्रश्न. ९** अमराठी भाषिक विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन कशाप्रकारे उपयुक्त ठरते ते लिहा. ०३

**प्रश्न. १०** मराठी अध्यापनातून विद्यार्थ्यांना गाभा घटक शिकविण्यासाठी कोणतेही दोन उपक्रम सविस्तर लिहा. ०३

***********



9BC9A6AF6921C5DD75671D1585F2355A